महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ३ ऑगस्ट, २०२६

क्रमांक : १३६२६ /क-१, या सचिवालयातील श्रीमती सीमा स.तांबे, अवर सचिव यांची पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या 'उप सचिव' (वेतनस्तर एस-२५ : ७८८००-२०९२००) पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

३. श्रीमती तांबे यांना उप सचिव पदावरील पदोन्नती पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) सदर पदोन्नती रिक्त झालेल्या पदावर प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे त्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यास 'उप सचिव' संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास श्रीमती तांबे यांना अवर सचिव पदावर पदावनत करण्याच्या अधीन सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

(ड) श्रीमती तांबे यांना सदर पदोन्नती उप सचिव पदावरील पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( मोहन काकड )
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

२/..

\\mlsc1-7\D\1401\2026\Promotion\Class I\उप सचिव\आदेश-उप सचिव.doc

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

**प्रतिलिपी :-**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
४) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय
५) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
६) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
९) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
१०) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१२) श्रीमती सीमा स.तांबे, अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१३) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
१४) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१५) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
१६) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय. (संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत)
१७) वैयक्तिक नस्ती
१८) निवडनस्ती